

**कोल्हापूर : खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या मराठी अनुवादाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सुजित मुंढे, श्रीपाद देसाई, अभय जायभये, विवेक जाधव, संग्राम मोरे आदी.**

# ‘आपत्ती व्यवस्थापन कायदा’चे प्रकाशन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा मराठी अनुवाद असणाऱ्या पुस्तकाचे प्रकाशन खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते झाले. शाहू जयंतीचे औचित्य साधून भवानी मंडप येथे हा समारंभ झाला. सुजित मुंढे यांनी हा अनुवाद केला आहे.

खासदार संभाजीराजे म्हणाले, ‘‘आपत्ती व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. या कायद्याचे मराठीत अनुवाद होणे ही अतिशय कौतुकाची बाब आहे. आपत्ती व्यवस्थापनाचा अभ्यास आणि प्रशिक्षण हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. मराठी अनुवाद पुस्तकाचा राज्यभरातील जनतेला निश्चित फायदा होईल.’’

शहाजी विधी महाविद्यालयातील सहायक प्रा. डॉ. श्रीपाद देसाई म्हणाले, ‘‘हा कायदा पूर्वी इंग्रजी, हिंदी आणि ओडिया या भाषेमध्ये उपलब्ध होता. आता तो मराठीतही उपलब्ध झाला आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून राज्यभरातील विद्यार्थी, प्राध्यापक तसेच सर्वसामान्यांना या कायद्याचे मातृभाषेतून समग्र आकलन होण्यासाठी आणि आपत्ती व्यवस्थापनाची राष्ट्रीय, राज्य, जिल्हा तसेच स्थानिक प्राधिकरणे यांची कार्यप्रणाली जाणून घेण्यास विशेष मदत होईल.’’ मुंढे यांनी आभार मानले. शिवाजी विद्यापीठातील सर्व अधिकाऱ्यांची यासाठी मदत झाल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये, विवेक जाधवर, संग्राम मोरे, छत्रपती संभाजीराजे फाउंडेशनचे पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.